ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक ३१४ • सोमवार दि.१४ सप्टेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

# लहरी पावसाने चिंता वाढवली;तरी 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात नांदेडकरांचा उत्साह दुणावला!

## गणरायाच्या स्वागतासाठी बाजारपेठा फुलल्या;पूजासाहित्य व सजावटीच्या खरेदीसाठी गर्दी




नांदेड/प्रतिनिधी-यंदा पावसाने डोळे वटारल्याने मराठवाड्यावर दुष्काळाचे सावट निर्माण झाले आहे. पावसाअभावी पिकांच्या वाढीवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली असून, ग्रामीण भागातील वातावरणात चिंतेचे सावट आहे. या प्रतिकूल परिस्थितीतही नांदेडकरांच्या उत्साहाला मात्र उधाण आले असून, गणपती बाप्पा मोरया... मंगलमूर्ती मोरया... च्या जयघोषात व ढोल-ताशांच्या गजरात गणरायाचे आज (सोमवार) जल्लोषात स्वागत करण्यात आले.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सोमवारी सकाळपासूनच नांदेड शहरातील प्रमुख बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. घरगुती गणपतीची प्रतिष्ठापना करणाऱ्या कुटुंबांसह सार्वजनिक गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनीही गणरायाच्या स्वागताची जय्यत तयारी केली. वजिराबाद, जुना मोंढा, शिवाजीनगर, श्रीनगर, छत्रपती चौक, हिंगोली नाका, आनंदनगर आणि साठे चौक परिसरातील बाजारपेठांमध्ये पूजेसाठी लागणारे साहित्य, फुले, हार, दुर्वा, सजावटीच्या वस्तू, विद्युत रोषणाई तसेच विविध प्रकारच्या आकर्षक सजावटीच्या साहित्याच्या खरेदीसाठी नागरिकांची गर्दी झाली होती.

गणरायाच्या आगमनाचा आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसून येत होता. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वजण गणपती बाप्पाच्या स्वागतासाठी उत्सुक असल्याचे चित्र होते. घरातील गणरायाची प्रतिष्ठापना अधिक आकर्षक व्हावी यासाठी विविध प्रकारच्या सजावटीच्या वस्तूंची खरेदी करण्यात आली. सार्वजनिक गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांनीही मंडप, विद्युत रोषणाई, फुलांची सजावट आणि देखाव्याची तयारी पूर्ण करण्यासाठी धावपळ केली.

दरम्यान, पावसाने ओढ दिल्याने शेतकरी वर्ग मात्र चिंतेत आहे. खरिपाच्या हंगामात पावसाची मोठी अपेक्षा असताना पावसाने सातत्य न राखल्यामुळे सोयाबीन, कापूस यांसह विविध पिकांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. एका बाजूला पिकांची चिंता, तर दुसऱ्या बाजूला गणरायाच्या आगमनाचा उत्साह, असे विरोधाभासी वातावरण नांदेड शहरासह जिल्ह्यात पाहायला मिळत आहे.

गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक एकोपा आणि बंधुभाव वाढविणारा उत्सव म्हणूनही साजरा केला जातो. त्यामुळे यंदाही सार्वजनिक गणेश मंडळांकडून सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रबोधनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सव, सामाजिक संदेश देणारे देखावे आणि विविध जनजागृतीपर उपक्रमांवरही मंडळांकडून भर दिला जात आहे. शहरातील अनेक गणेश मंडळांनी मोठ्या स्वरुपाच्या गणेश मूर्तींची प्रतिष्ठापणा केली आहे. श्री गणरायाच्या पान ४ वर

# दिशा सालियन मृत्यू प्रकरणी सीबीआयकडून गुन्हा दाखल

## सतीश सालियन यांच्या जबाबानंतर कारवाई

मुंबई/प्रतिनिधी-दिवंगत अभिनेता सुशांत सिंह राजपूत याची व्यवस्थापक दिवंगत दिशा सालियन हिच्या मृत्यूप्रकरणी अखेरीस सहा वर्षांनंतर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. दिशाचे वडील सतीश सालियन यांनी दोन दिवसांपूर्वी सीबीआयकडे जबाब नोंदवल्यानंतर या प्रकरणी आता गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



दिशा सालियन हिच्या मृत्यूबाबत सीबीआय चौकशी आणि एफआयआर दाखल करण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने २ सप्टेंबरला दिले होते. ८ जून २०२० रोजी मुंबईतील मालाड येथील एका इमारतीच्या १४ व्या मजल्यावरून पडून दिशाचा मृत्यू झाला होता. दिशाच्या मृत्यूनंतर अवघ्या सहा दिवसांनी, म्हणजेच १४ जून २०२० रोजी सुशांत सिंह राजपूतचाही मृत्यू झालेला. दरम्यान, दिशाचे वडील सतीश सालियन यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करून आपल्या मुलीच्या मृत्यूची नव्याने चौकशी करण्याची आणि सीबीआयद्वारे तपास करण्याची मागणी केली होती. त्यानुसार, त्यांच्या याचिकेला मान्य करत या प्रकरणी सुनावणी करताना न्यायालयाने या प्रकरणी सीबीआय चौकशीचे आदेश दिले होते. महत्त्वाची बाब म्हणजे, या प्रकरणी सुनावणी करताना पोलिसांच्या तपासात अनेक गंभीर विसंगती दिसून आल्याचे म्हटले होते. या तपासातून प्रश्नांची उत्तरे मिळण्याऐवजी आणखी प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामुळे या प्रकरणाचा नव्याने आणि स्वतंत्र तपास करण्यासाठी सीबीआयची आवश्यकता असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. त्यानुसार, न्यायालयाने सीबीआयला अनुभवी आणि वरिष्ठ अधिकाऱ्याची तपास अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याचे निर्देश दिले होते. तसेच दिशा यांचे वडील सतीश सालियन यांचा जबाब नोंदवून एफआयआर दाखल करण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे आता हा गुन्हा दाखल झाला आहे.

उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर दिशा सालियान यांचे वडील सतीश सालियान यांनी ११ सप्टेंबर रोजी मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलातील सीबीआय कार्यालयात हजेरी लावून आपला जबाब नोंदवला. त्यांच्यासोबत त्यांचे वकील निलेश ओझा होते. जबाब नोंदवण्याची प्रक्रिया अनेक तास सुरू होती. सतीश सालियान यांनी आपल्या जबाबात काही व्यक्तींची नावे घेतल्याचे वृत्त आहे. त्यामुळे आता मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केल्याप्रमाणे या प्रकरणात दिशाचे वडीले सतीश सालियन ज्या ज्या लोकांची नावे घेतील, त्यांची चौकशी केली जाईल. मात्र, तपासातून पुरेसे आणि वाजवी संशय निर्माण करणारे ठोस साहित्य समोर येईपर्यंत कोणत्याही व्यक्तीला आरोपी म्हणून पाहिले जाऊ नये, असेही न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले आहे.

# मनोज जरांगे यांना पुन्हा धक्का;पोलिसांनी दुसऱ्यांदा आंदोलनाला परवानगी नाकारली

मुंबई/प्रतिनिधी-मराठा समाजाच्या प्रलंबित मागण्यांसाठी आणि सरकारच्या आश्वासनांच्या अंमलबजावणीसाठी मुंबईतील आझाद मैदानावर आमरण उपोषणाला बसण्याच्या तयारीत असलेल्या मनोज जरांगे पाटील यांना मुंबई पोलिसांनी पुन्हा एकदा मोठा धक्का दिला आहे. रविवारी आझाद मैदान पोलिसांनी पहिला अर्ज फेटाळल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांच्यावतीने नव्याने उपोषणाची परवानगी मागण्यात आली होती. मात्र, मुंबई पोलिसांनी अत्यंत कठोर भूमिका घेत दुसऱ्यांदाही या आंदोलनाला परवानगी नाकारली आहे.

गणेशोत्सवानंतर जरांगेंच्या उपोषणाला आझाद मैदान सोडून इतर ठिकाणी परवानगी देण्यात येईल, असं पत्रही मुंबई पोलिसांनी दिल्याची माहिती आहे. मात्र, सलग दुसऱ्यांदा परवानगी नाकारल्यामुळे आता मनोज जरांगे पाटील काय भूमिका घेतात, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. मनोज जरांगे



पाटील यांनी १९ सप्टेंबरपासून मुंबईच्या ऐतिहासिक आझाद मैदानावर अनिश्चित काळासाठी आमरण उपोषणाची हाक दिली आहे. १५ सप्टेंबर रोजी ते अंतरवाली सराटीतून मुंबईच्या दिशेने कूच करणार आहेत. परंतु, पोलिसांनी लागोपाठ दोनदा परवानगी फेटाळल्याने १९ तारखेच्या या उपोषणावर आणि मुंबई मार्चवर अनिश्चिततेचे ढग जमा झाले आहेत. गेल्या वर्षी आंदोलना दरम्यान दक्षिण मुंबईत सुमारे ५,००० वाहने अनधिकृतपणे उभी राहिल्याने संपूर्ण वाहतूक विस्कळीत झाली होती आणि कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण झाले होते.१४ सप्टेंबरपासून मुंबईत मोठ्या उत्साहात गणेशोत्सव सुरू आहे. या काळात मुंबईत भाविकांची प्रचंड गर्दी असते, त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने मुंबई अतिशय संवेदनशील मानली जाते.आझाद मैदानातील ७,००० चौरस मीटर जागेत नियम २०२५ नुसार कमाल ५,००० आंदोलकच समावू शकतात. मात्र जरांगेंनी लाखोंच्या संख्येने येण्याचे आवाहन केले आहे.वाहतूक आणि रुग्ण सेवा:लाखो आंदोलक मुंबईत आल्यास दक्षिण मुंबईतील महत्त्वाची रुग्णालये (जी.टी., कामा, सेंट जॉर्ज, बॉम्बे हॉस्पिटल), न्यायालये पान ४ वर

# देशी दारुचे बॉक्स जप्त

नांदेड/प्रतिनिधी-मौजे वायवाडी फाटा ता.हिमायतनगर येथे रविवारी दुपारी हिमायतनगर पोलीसांनी धाड टाकुन सोळा हजार रुपये किंमतीची देशी दारु जप्त केली आहे.

मौजे वायवाडी येथे अनेक दिवसांपासून देशी दारुची बेकायदेशिर विक्री होत असल्याची माहिती हिमायतनगर पोलीसांना मिळाली. पोलीसाच्या एका पथकाने रविवारी दुपारी मौजे वायवाडी फाटा येथील घरावर छापा टाकला. अवैधरित्या देशी दारु विक्रीसाठी ठेवण्यात आलेले दारुचे बॉक्स पोलीसांना आढळून आले. पोलीसांनी घटनास्थळावरुन सोळा हजार रुपये किंमतीची दारु जप्त केली आहे. याप्रकरणी पोलीस जमादार नवाबखान युसुफखान यांनी दिलेल्या तक्रारीवरुन हिमायतनगर पोलीस ठाण्यात वसंत परसराम राठोड (वय ४४) रा.बळीराम तांडा, ता.हिमायतनगर, संतोष गादेवार रा.पोटा ता.हिमायतनगर व आदित्य रा.सोनारी या तीन जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




नांदेड शहरात गणेश उत्सवाला प्रारंभ झाला असून आज जुन्या नांदेडच्या राजाचे गणेश भक्तांनी मोठ्या थाटात वाजतगाजत गणपती बाप्पा मोरय्या...मंगल मूर्ती मोरय्या...चा जयघोष करीत जोरदार स्वागत केले.

# व्यवसायीक सिलेंडरचा काळा बाजार करणाऱ्या इसमास अटक

## ५२ गॅस सिलेंडरसह वाहन जप्त

नांदेड/प्रतिनिधी-व्यवसायीक गॅस सिलेंडरचा काळा बाजार करणाऱ्या एका इसमास उस्माननगर रोडवर रविवारी नांदेड ग्रामीण पोलीसांनी अटक केली. त्याच्याकडून गॅस सिलेंडर, छोटा हत्ती वाहन असा ८ लाख ३४ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

उस्माननगर रोडवरील कोहिनुर मिल ऑईलच्या बाजुला व्यवसायीक गॅस सिलेंडरचा काळा बाजार होत असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, फौजदार बी.ई.चव्हाण व पोलीस कर्मचाऱ्यांनी रविवारी दुपारी पंचासमक्ष सदर ठिकाणी छापा टाकला. टाटा कंपनीच्या छोटा हत्ती या वाहनात पोलीसांना व्यवसायीक गॅस सिलेंडर आढळून आले. पोलीसांनी वाहन चालक श्यामलाल शंकरलाल सारंग रा. शिवाजीनगर, मुखेड यास ताब्यात घेवून त्याची चौकशी केली असता त्याने सदरील गॅस सिलेंडर हे काळ्या बाजारात विक्री व रिफिलिंगसाठी आणल्याची कबुली दिली. सिलेंडर वाहतुकीचा व विक्री



करण्या संदर्भात कोणताही परवाना त्याच्याकडे आढळून आला नाही. पोलीसांनी भारत कंपनीचे व्यवसायीक गॅस सिलेंडर, छोटा हत्ती वाहन असा ८ लाख ३४ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला. श्यामलाल सारंग याच्या विरुध्द नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात जीवनावश्यक वस्तू अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# इंडस्ट्रियल इस्टेट परिसरात शंभर वृक्षांची लागवड


नांदेड/प्रतिनिधी-कै. रामगोपाल गुप्ता इंडस्ट्रियल इस्टेट, लायन्स फॅमिली व वृक्षमित्र फाउंडेशनचा संयुक्त उपक्रम घेन्यात आला. पर्यावरणाचा समतोल राखण्यासोबतच हरित नांदेडच्या संवर्धनासाठी कै. रामगोपाल गुप्ता कॉ-ऑप. इंडस्ट्रियल इस्टेट, शिवाजीनगर, नांदेड, लॉयन्स क्लब नांदेड मिडटाऊन व लायन्स फॅमिली आणि वृक्षमित्र फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने इंडस्ट्रियल इस्टेट परिसरात विविध जातींच्या शंभर वृक्षांची लागवड करण्यात आली.

उपप्रांतपाल लायन योगेश जायसवाल यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी माजी उपप्रांतपाल जयेश ठक्कर, वर्षा ठक्कर, अमृता जायसवाल, ॲड. प्रविण अग्रवाल, करुणा अग्रवाल, क्षेत्रीय अध्यक्ष सुरभी माहेश्वरी, लायन्स क्लब नांदेड मिडटाऊनचे अध्यक्ष सरताजसिंघ कंधारवाले, केदार मालपाणी, लॉ. शिरीष कासलीवाल, ज्ञानेश्वर थिटे, लॉ. राजेंद्र हुरणे, राजश्री हुरणे, मनप्रीत कौर, स्मिता कडगे, सतीश शिरूरकर, सुनंदा शिरूरकर, मुकेश अग्रवाल, शैली अग्रवाल, अमरसिंह चौव्हाण, ओमप्रकाश मानधने, अल्का मानधने, सुनीता चौव्हाण, नरेश व्होरा, प्रदीप सोनपेठकर, शिवाजी इबीतवार, रवि कासलीवाल, रमेश रेड्डी, अर्जुन दमाम, शिरीष गिते, विजय होकर्णे तसेच वृक्षमित्र फाउंडेशनचे शैलेन्द्र क्षीरसागर, प्रितम भराडीया, सुधाकर चेरकुला आदी पदाधिकारी व सदस्याच्या हस्ते कदंब, बकुळ, करंज, कडुनिंब आदी विविध जातींच्या रोपांची लागवड करण्यात आली.

# गणरायाच्या उत्सवातून विवेकाचा जागर

**हिंदू संस्कृतीत गणराया हा विद्येचा, बुद्धीचा आणि विवेकाचा देवता मानला जातो. म्हणूनच गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता समाजाला विचार देणारा, माणसांना जोडणारा आणि नव्या परिवर्तनाची दिशा दाखवणारा उत्सव ठरला पाहिजे. सार्वजनिक गणेशोत्सवाच्या मागे असलेली हीच व्यापक भूमिका आज पुन्हा अधोरेखित करण्याची गरज निर्माण झाली आहे. ब्रिटिश राजवटीच्या काळात समाजात जनजागृती निर्माण करण्यासाठी लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला व्यापक सामाजिक स्वरूप दिले. त्यामागे केवळ धार्मिक भावना नव्हती, तर विखुरलेल्या समाजाला एका व्यासपीठावर आणून स्वातंत्र्याची जाणीव निर्माण करणे, सामाजिक प्रश्नांवर चर्चा घडवून आणणे आणि जनतेमध्ये राष्ट्रीय भावनेची ज्योत प्रज्वलित करणे हा उद्देश होता. गणेशोत्सवातील व्याख्याने, कीर्तने, नाटके, सांस्कृतिक कार्यक्रम आणि प्रबोधनाच्या माध्यमातून समाजमन घडविण्याचे काम झाले.या परंपरेला दीडशे वर्षांहून अधिक काळ लोटला. काळ बदलला, परिस्थिती बदलली, तंत्रज्ञान आले; मात्र गणेशोत्सवामागील प्रबोधनाची गरज संपलेली नाही. उलट आजच्या गुंतागुंतीच्या सामाजिक परिस्थितीत ती अधिक तीव्रतेने जाणवते. दुर्दैवाने अनेक ठिकाणी उत्सवाचा प्रबोधनाचा गाभा मागे पडून तो केवळ भावनिक आणि धार्मिक स्वरूपाचा होत चालला आहे. धार्मिकतेला विरोध असण्याचे कारण नाही. प्रत्येकाला आपली श्रद्धा जोपासण्याचा अधिकार आहे. मात्र श्रद्धेच्या नावाखाली निर्माण होणारे प्रदूषण, ध्वनिप्रदूषण, सामाजिक तणाव आणि सार्वजनिक जीवनातील अस्वस्थता याबाबत प्रश्न उपस्थित करणेही तितकेच आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर यंदाच्या गणेशोत्सवाच्या प्रारंभी विद्यानंद बापट यांनी डीजेच्या वाढत्या वापराविरोधात आवाज उठविला. हा विषय यापूर्वी अनेकांच्या मनात असला तरी त्यावर ठामपणे बोलण्याचे धाडस फारसे कोणी केले नव्हते. विरोधाची किंमत मोजावी लागू शकते, प्रसंगी चापट खावी लागू शकते, हे माहीत असूनही त्यांनी प्रश्न उपस्थित केला. त्यामुळे डीजेचा विषय पुन्हा सार्वजनिक चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. एखाद्या व्यक्तीचा विरोध म्हणून नव्हे, तर सार्वजनिक आरोग्य, विद्यार्थ्यांचे शिक्षण, वृद्ध आणि रुग्णांची शांतता आणि कायद्याच्या अंमलबजावणीचा प्रश्न म्हणून या विषयाकडे पाहिले पाहिजे.गणरायाला विद्येची देवता मानताना आपल्या शिक्षणव्यवस्थेतील प्रश्नांकडेही डोळेझाक करून चालणार नाही. गेल्या काही काळापासून महाराष्ट्रासह देशभरात विविध स्पर्धा आणि प्रवेश परीक्षांमधील पेपरफुटीच्या घटना समोर येत आहेत. मेहनत करून परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचा विश्वास या घटनांमुळे डळमळीत होतो. दुसरीकडे आरक्षणाच्या प्रश्नावरून विविध समाजघटकांमध्ये असंतोष आणि संघर्षाची भावना निर्माण होत आहे. बेरोजगारी, महागाई, शिक्षणाचा वाढता खर्च, सामाजिक विषमता आणि तरुणांच्या भवितव्याचा प्रश्नही तितकाच गंभीर आहे. अशा वेळी गणेशोत्सवाच्या मंडपातून केवळ आरती आणि मनोरंजन नव्हे, तर समाजाच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर विचारमंथन झाले पाहिजे. पेपरफुटीला आळा कसा घालायचा? विद्यार्थ्यांचा परीक्षाव्यवस्थेवरील विश्वास कसा पुनर्स्थापित करायचा?आरक्षणाच्या प्रश्नावर समाजघटकांमध्ये संवाद कसा वाढवायचा? ध्वनिप्रदूषणाला आळा घालत उत्सवाचा आनंद कसा कायम ठेवायचा? धार्मिक श्रद्धा आणि सामाजिक जबाबदारी यांचा समतोल कसा साधायचा? अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे व्यासपीठ गणेशोत्सवाने बनले पाहिजे. लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाला समाजजागृतीचे माध्यम बनविले होते. आज त्याच उत्सवाला नव्या काळातील प्रश्नांवर विवेक जागविण्याचे माध्यम बनविणे हीच टिळकांना खरी आदरांजली ठरेल. गणरायाच्या हातातील मोदकापेक्षा त्याच्या मस्तकावरील बुद्धीचे प्रतीक आणि त्याच्याकडून अपेक्षित असलेला विवेक अधिक महत्त्वाचा आहे. गणेशोत्सव संपताना केवळ मूर्तीचे विसर्जन होऊ नये; आपल्या मनातील अज्ञान, पूर्वग्रह, द्वेष आणि असंवेदनशीलतेचेही विसर्जन झाले पाहिजे. श्रद्धेला विवेकाची, उत्सवाला सामाजिक जाणिवेची आणि आनंदाला जबाबदारीची जोड मिळाली, तरच गणरायाचा उत्सव खऱ्या अर्थाने समाजाचा उत्सव ठरेल. या गणेशोत्सवात विचारमंथन घडावे आणि महाराष्ट्राच्या सामाजिक प्रश्नांना संवादातून सर्वमान्य मार्ग सापडावा, हीच गणरायाच्या चरणी अपेक्षा!**

# दुष्काळग्रस्तांच्या दुःखावर दौऱ्यांचे राजकारण कशासाठी?



नांदेड जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त आणि नैसर्गिक संकटाने त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सध्या राजकीय दौरे, पाहणी आणि आश्वासनांची मोठी चर्चा सुरू आहे. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या अडचणी समजून घेणे, त्यांच्या पिकांची पाहणी करणे, प्रशासनाला तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश देणे आणि शासनाकडून योग्य ती आर्थिक मदत मिळवून देणे, ही लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे. मात्र, केवळ प्रसिद्धीसाठी दौरे काढणे, काही ठिकाणी भेट देणे, छायाचित्रे काढणे आणि ती माध्यमांमध्ये प्रसिद्ध करणे एवढ्यावरच लोकप्रतिनिधींची भूमिका मर्यादित राहणार असेल, तर त्याचा खरा फायदा संकटग्रस्त शेतकऱ्यांना किती होणार, हा प्रश्न आज सामान्य नागरिक विचारत आहे.

दुष्काळ असो, अतिवृष्टी असो, पूरस्थिती असो किंवा एखादी दुर्घटना असो; संकटाच्या काळात लोकप्रतिनिधी घटनास्थळी पोहोचतात, ही लोकशाहीतील स्वागतार्ह बाब आहे. मात्र, त्या दौऱ्यामागे केवळ राजकीय प्रसिद्धी आणि सहानुभूती मिळविण्याचा हेतू आहे की प्रत्यक्ष मदत करण्याची तळमळ आहे, हे त्यांच्या पुढील कृतीतून दिसून आले पाहिजे. शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन त्यांची व्यथा ऐकणे ही पहिली पायरी आहे; त्यानंतर नुकसानभरपाई मिळवून देणे, पंचनामे वेळेत करून घेणे, विमा कंपन्यांकडून भरपाई मिळवून देणे, पाणीटंचाईवर उपाय करणे, सिंचनाच्या सुविधा निर्माण करणे आणि पुढील हंगामासाठी शेतकऱ्यांना आधार देणे, हे खरे काम आहे.आज अनेक शेतकरी आर्थिक संकटात आहेत. पिकांचे नुकसान झाले असेल तर त्यांच्या हातात पैसा कधी येणार, पंचनामे कधी होणार, मदतीचे निकष काय असणार आणि प्रत्यक्ष खात्यावर रक्कम कधी जमा होणार, याची चिंता त्यांना सतावत आहे. सरकारने मदतीची एखादी रक्कम निश्चित केली असेल, तर ती केवळ कागदावर राहता कामा नये. लोकप्रतिनिधींनी प्रशासनाकडे पाठपुरावा करून ती मदत प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम केले पाहिजे.

एखाद्या संकटग्रस्त भागाला भेट देताना लोकप्रतिनिधींनी त्या भागाची पूर्वतयारी करून माहिती घेतली पाहिजे. कोणत्या गावात किती नुकसान झाले? किती हेक्टर क्षेत्र बाधित झाले? कोणती पिके नष्ट झाली? किती शेतकरी प्रभावित झाले? पाण्याची उपलब्धता किती आहे? रस्ते, वीज, सिंचन आणि बाजारपेठेची परिस्थिती काय आहे? या सर्व प्रश्नांचा अभ्यास करूनच पाहणी दौरा केला पाहिजे. अन्यथा, एखाद्या अधिकाऱ्याने दाखविलेल्या ठिकाणी जाऊन काही मिनिटांची पाहणी करणे आणि त्यानंतर सर्व परिस्थिती नियंत्रणात आहे किंवा सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे अशी घोषणा करणे, यामुळे शेतकऱ्यांचे प्रश्न सुटत नाहीत.विशेषतः मुंबई किंवा दिल्लीसारख्या दूरच्या ठिकाणी बसून एखाद्या जिल्ह्यातील परिस्थितीची माहिती मिळू शकते; परंतु कागदावरील आकडे आणि प्रत्यक्ष जमिनीवरील वास्तव यात मोठा फरक असतो. कार्यालयीन अहवालात एखाद्या गावाचे नुकसान कमी दाखविले जाऊ शकते; प्रत्यक्षात मात्र शेतकऱ्याचे संपूर्ण पीक हातातून गेलेले असू शकते. त्यामुळे संकटग्रस्त भागाची खरी परिस्थिती समजून घेण्यासाठी लोकप्रतिनिधींनी केवळ अधिकाऱ्यांच्या अहवालावर अवलंबून न राहता शेतकऱ्यांशी थेट संवाद साधणे आवश्यक आहे. नांदेड जिल्ह्याच्या संदर्भात हा प्रश्न अधिक गंभीर आहे. जिल्ह्याचा भौगोलिक विस्तार मोठा असून ग्रामीण भागात विविध प्रकारच्या समस्या आहेत. एका भागात पाण्याची कमतरता असू शकते, तर दुसऱ्या भागात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेले असू शकते. कुठे सिंचनाचा प्रश्न आहे, तर कुठे रस्ते आणि वीजपुरवठ्याची समस्या आहे. अशा परिस्थितीत संपूर्ण जिल्ह्याचे प्रश्न एकाच चौकटीत बसविता येत नाहीत. प्रत्येक तालुक्याची आणि गावाची स्वतंत्र परिस्थिती समजून घेणे गरजेचे आहे.मग प्रश्न असा निर्माण होतो की, लोकप्रतिनिधी खरोखर किती वेळा शेतकऱ्यांच्या शेतावर गेले आहेत? निवडणुकीच्या काळात शेतकऱ्यांच्या बांधावर जाणे आणि संकटाच्या काळात फोटो काढण्यासाठी शेतात जाणे, यापलीकडे त्यांचा शेतकऱ्यांशी सातत्याने संपर्क आहे का? शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चाचा, बाजारभावाचा, सिंचनाचा, कर्जाचा आणि विम्याचा प्रश्न त्यांनी सातत्याने मांडला आहे का? हे प्रश्न विचारणे चुकीचे नाही. उलट, लोकशाहीमध्ये जनतेला आपल्या प्रतिनिधींना प्रश्न विचारण्याचा पूर्ण अधिकार आहे.शेताची पाहणी करणे म्हणजे केवळ पिकांकडे पाहणे नव्हे. शेती समजून घेण्यासाठी शेतकऱ्याचे संपूर्ण अर्थकारण समजून घ्यावे लागते. बी-बियाणे, खत, औषधे, मजुरी, सिंचन, वीज, कर्ज, बाजारभाव आणि उत्पादन विक्रीपर्यंतची संपूर्ण साखळी समजून घ्यावी लागते. शेतकऱ्याच्या घरात वर्षभराचा खर्च कसा भागतो, कर्जाचा हप्ता कसा भरला जातो, मुलांच्या शिक्षणाचा खर्च कसा केला जातो, याची जाणीव असणे आवश्यक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या समस्येवर राजकीय भाषणे करण्यापेक्षा प्रत्यक्ष शेती अर्थव्यवस्थेचा अभ्यास करणे अधिक महत्त्वाचे आहे. दुसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे विकासकामे. एखादे काम वर्षानुवर्षे प्रलंबित असेल, तर त्याची जबाबदारी कोणाची? एका ठिकाणी वारंवार त्याच प्रकारचे काम का करावे लागते? एका कामासाठी निधी मंजूर होतो, निविदा निघते, काम सुरू होते; परंतु कामाची गुणवत्ता आणि पूर्णत्वाची तारीख याबाबत प्रश्न निर्माण होत असतील, तर त्याची चौकशी कोण करणार? नागरिकांनी या प्रश्नांची उत्तरे मागितली पाहिजेत.किती कोटींचा निधी आणला याची घोषणा करण्यापेक्षा त्या निधीतून नेमके काय झाले, हे सांगणे महत्त्वाचे आहे. रस्ते झाले का? पाणीपुरवठा सुधारला का? सिंचनाची सुविधा निर्माण झाली का? शाळा आणि आरोग्य केंद्रांची स्थिती सुधारली का? शेतकऱ्यांना बाजारपेठ मिळाली का? बेरोजगार युवकांसाठी संधी निर्माण झाल्या का? या प्रश्नांची उत्तरे दिल्याशिवाय केवळ कोट्यवधी रुपयांच्या निधीची आकडेवारी सांगून विकास सिद्ध होत नाही.याच ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांची भूमिकाही महत्त्वाची ठरते. जिल्हा प्रशासनाने कोणत्याही राजकीय दबावाखाली न येता कायदा, नियम आणि शासनाच्या निकषांनुसार निर्णय घेतले पाहिजेत. लोकप्रतिनिधींच्या मागण्या ऐकणे हे प्रशासनाचे काम असले, तरी निधीचे वितरण, नुकसानभरपाई, पंचनामे आणि विकासकामांमध्ये पारदर्शकता राखणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. कोणत्याही गावाला किंवा व्यक्तीला राजकीय जवळीकच्या आधारावर प्राधान्य मिळू नये. संकटग्रस्त व्यक्तीला त्याच्या वास्तविक नुकसानीच्या आधारावर मदत मिळाली पाहिजे.

बाहेरचा पालकमंत्री असो किंवा स्थानिक लोकप्रतिनिधी असो, जनतेला त्याच्याकडून काम अपेक्षित आहे. पालकमंत्री जिल्ह्याबाहेरील असला तरी त्याने जिल्ह्याची सखोल माहिती घेणे आवश्यक आहे. केवळ जिल्हाधिकारी किंवा स्थानिक अधिकाऱ्यांनी दाखविलेल्या ठिकाणी जाऊन परिस्थिती समजून घेण्याचा प्रयत्न केला, तर जिल्ह्याच्या वास्तविक समस्यांची संपूर्ण कल्पना येणार नाही. पालकमंत्र्याने नियमितपणे जिल्ह्याचा आढावा घ्यावा, विविध तालुक्यांना भेटी द्याव्यात, नागरिक, शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी आणि सामाजिक संघटनांशी संवाद साधावा, अशी अपेक्षा असणे स्वाभाविक आहे.नांदेडला स्थानिक प्रश्नांची जाण असलेले नेतृत्व मिळावे, अशी मागणी अनेकदा होत असते. कारण स्थानिक परिस्थिती समजून घेण्यासाठी त्या भागातील सामाजिक, आर्थिक आणि भौगोलिक वास्तवाची माहिती असणे आवश्यक असते. मात्र, स्थानिक असो किंवा बाहेरचा असो, कोणत्याही लोकप्रतिनिधीचे मूल्यमापन त्याच्या कामावरच झाले पाहिजे. आपला किंवा बाहेरचा या चौकटीत प्रश्न अडकविण्यापेक्षा जनतेच्या समस्या कोण सोडवतो, हे अधिक महत्त्वाचे आहे.एखादी दुर्घटना घडली की संबंधित घटनेची माहिती लोकप्रतिनिधींना तातडीने मिळते. प्रशासन, पोलीस, स्थानिक कार्यकर्ते आणि माध्यमे यांच्यामार्फत माहिती पोहोचते. त्यामुळे घटना कशी कळली? हा प्रश्न स्वतःमध्ये महत्त्वाचा नसला तरी, माहिती मिळाल्यानंतर लोकप्रतिनिधीने काय केले, हा खरा प्रश्न आहे. घटनास्थळी जाऊन फोटो काढला की जबाबदारी संपली का? की जखमींना उपचार मिळवून देणे, मृतांच्या कुटुंबीयांना मदत मिळवून देणे, दुर्घटनेची कारणे शोधणे आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी उपाययोजना करणे ही खरी जबाबदारी आहे? जनतेला आता केवळ आश्वासन नको आहे. जनतेला परिणाम हवा आहे. शेतकऱ्याला मदत हवी आहे, तर ती त्याच्या खात्यात कधी जमा झाली हे महत्त्वाचे. रस्ता मंजूर झाला असेल, तर तो प्रत्यक्षात कधी पूर्ण झाला हे महत्त्वाचे. सिंचनासाठी निधी मिळाला असेल, तर किती शेतकऱ्यांना त्याचा लाभ झाला हे महत्त्वाचे. रुग्णालयासाठी निधी मिळाला असेल, तर त्यामध्ये कोणत्या सुविधा निर्माण झाल्या हे महत्त्वाचे. शिक्षणासाठी निधी मिळाला असेल, तर विद्यार्थ्यांच्या सुविधांमध्ये काय बदल झाला हे महत्त्वाचे.लोकशाहीमध्ये प्रसिद्धीला स्थान आहे; परंतु प्रसिद्धीपेक्षा काम मोठे असले पाहिजे. माध्यमांमध्ये फोटो येणे ही लोकप्रतिनिधीची उपलब्धी नाही. जनतेच्या जीवनात प्रत्यक्ष सुधारणा घडवून आणणे ही उपलब्धी आहे. एखाद्या शेतकऱ्याच्या डोळ्यातील चिंता कमी झाली, एखाद्या गावाला पाणी मिळाले, एखादा रस्ता वेळेत पूर्ण झाला, एखाद्या दुर्घटनेतील कुटुंबाला तातडीची मदत मिळाली, एखाद्या विद्यार्थ्याला शिक्षणाची संधी मिळाली, तर तो खरा विकास आहे.आज सोशल मीडिया आणि माध्यमांच्या युगात प्रत्येक दौऱ्याचा फोटो काही मिनिटांत हजारो लोकांपर्यंत पोहोचतो. त्यामुळे राजकीय नेत्यांसाठी प्रसिद्धी मिळविणे पूर्वीपेक्षा सोपे झाले आहे. पण त्याच वेगाने जनतेची अपेक्षाही वाढली आहे. फोटो पाहून लोक आता प्रश्न विचारतात. यानंतर काय झाले? हा प्रश्न सर्वात महत्त्वाचा आहे.

दौरा झाला, पाहणी झाली, निवेदन देण्यात आले, अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या, मदतीचे आश्वासन देण्यात आले; त्यानंतर त्याची अंमलबजावणी झाली का? जर झाली नसेल, तर त्याचा पाठपुरावा कोणी केला? हा पाठपुरावा सार्वजनिक झाला पाहिजे. लोकप्रतिनिधींनी आपल्या मतदारांना सांगितले पाहिजे की, अमुक गावातील अमुक समस्या सोडविण्यासाठी एवढा निधी मंजूर झाला आणि अमुक तारखेला काम पूर्ण झाले. अशी पारदर्शक कार्यपद्धती असेल तर जनतेचा विश्वास वाढेल.दुष्काळग्रस्तांच्या प्रश्नावर राजकारण करण्याऐवजी सर्व पक्षांनी एकत्र येणे गरजेचे आहे. शेतकरी कोणत्या पक्षाचा आहे, याला अर्थ नाही. त्याचे पीक नष्ट झाले असेल तर त्याला मदत मिळालीच पाहिजे. त्याचे घर संकटात असेल तर प्रशासनाने धावून गेले पाहिजे. त्याला पाणी हवे असेल तर पाणी मिळाले पाहिजे. त्याच्या मुलांचे शिक्षण अडचणीत आले असेल तर त्यासाठी मदत झाली पाहिजे.ज्येष्ठ नागरिक, शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते आणि सामान्य नागरिक आज हाच प्रश्न विचारत आहेत. दौरे किती झाले, यापेक्षा प्रश्न किती सुटले? किती फोटो प्रसिद्ध झाले, यापेक्षा किती कुटुंबांना प्रत्यक्ष मदत मिळाली? किती कोटींची घोषणा झाली, यापेक्षा किती कोटींचा योग्य वापर झाला? किती बैठका झाल्या, यापेक्षा किती निर्णयांची अंमलबजावणी झाली?नांदेडच्या जनतेला नाटक नको; काम हवे आहे. आश्वासन नको; परिणाम हवा आहे. प्रसिद्धी नको; पारदर्शकता हवी आहे. राजकीय श्रेयाची स्पर्धा नको; संकटग्रस्तांच्या मदतीसाठी स्पर्धा हवी आहे. शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील अश्रू पुसण्यासाठी खऱ्या अर्थाने मैदानात उतरणारे नेतृत्व हवे आहे.



**दत्तोपंत डहाळे**
नांदेड.

लोकप्रतिनिधींनी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे.जनता सर्व काही पाहत असते. कोण संकटाच्या वेळी कुठे उभा राहतो, कोण फक्त फोटोसाठी येतो, कोण प्रश्न मांडतो आणि कोण त्याचा शेवटपर्यंत पाठपुरावा करतो, याची नोंद जनतेच्या स्मरणात राहते. निवडणूक आली की विकासाच्या घोषणा करणे सोपे आहे; पण पाच वर्षे सातत्याने जनतेच्या प्रश्नांसाठी काम करणे कठीण आहे. म्हणूनच आता दौऱ्यांच्या संख्येपेक्षा कामाचा हिशेब द्यावा लागेल.दुष्काळग्रस्त भागाची पाहणी ही केवळ राजकीय कार्यक्रम नसून ती मानवी जबाबदारी आहे. शेतकऱ्याच्या शेतात उभे राहून त्याची व्यथा ऐकणे म्हणजे त्याच्या दुःखाचा फोटो काढणे नव्हे, तर त्या दुःखाचे कारण शोधणे आणि त्यावर उपाय करणे होय. शासनाने मदत जाहीर केली असेल तर ती वेळेत मिळवून देणे, पंचनाम्यांमध्ये पारदर्शकता ठेवणे, प्रशासनावर अनावश्यक दबाव येऊ न देणे आणि प्रत्येक पात्र कुटुंबापर्यंत मदत पोहोचविणे, हीच खरी लोकसेवा आहे.आज नांदेडला गरज आहे ती केवळ दौऱ्यांची नाही, तर अभ्यासपूर्ण आणि परिणामकारक नेतृत्वाची. जिल्ह्यातील प्रत्येक तालुका, प्रत्येक गाव आणि प्रत्येक शेतकऱ्याची समस्या समजून घेणाऱ्या यंत्रणेची गरज आहे. निधीच्या घोषणा करण्यापेक्षा निधीचा हिशेब देण्याची गरज आहे. फोटो काढण्यापेक्षा काम पूर्ण करण्याची गरज आहे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, जनतेला केवळ सहानुभूती दाखविण्याऐवजी तिच्या संकटातून बाहेर काढण्यासाठी ठोस कृती करण्याची गरज आहे.कारण शेवटी जनतेचा एकच साधा प्रश्न आहे; दौरा झाला, फोटो झाला, घोषणा झाली; पण आमचे दुःख कमी झाले का? या प्रश्नाचे प्रामाणिक उत्तर देण्याची वेळ आता सर्व लोकप्रतिनिधींवर आली आहे.

# वृत्तपत्र विक्रेत्यांचे ९ आक्टोंबरला राज्यभर मोर्चे;कल्याणकारी मंडळासाठी राज्य संघटनेची आंदोलनाची हाक



सोलापूर:स्वतंत्र वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी मंडळाच्या अंमलबजावणीसाठी ९ आक्टोंबरला राज्यात सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर परिवारासह मोर्चा काढण्याचा निर्धार महाराष्ट्र राज्य विक्रेता संघटनेच्या कार्यकारणी बैठकीत करण्यात आला. राज्य संघटनेचे अध्यक्ष सुनिल पाटणकर यांच्या अध्यक्षतेखाली व कार्याध्यक्ष बालाजी पवार, सरचिटणीस विकास सूर्यवंशी यांच्या प्रमुख उपस्थितीत सोलापूर येथे झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेची राज्य कार्यकारणी बैठक समृद्धी गार्डन सोलापूर येथे शनिवारी पार पडली. संघटनेचे अध्यक्ष श्री पाटणकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन बैठकीस सुरवात झाली. स्वागत राज्य संघटनेचे कार्यकारणी सदस्य गोरख भिलारे यांनी केले. सरचिटणीस विकास सूर्यवंशी यांनी प्रास्ताविक करून बैठकीस सुरवात केली.संघटनेचे अध्यक्ष सुनील पाटणकर म्हणाले, गेली अनेक वर्षे संघटनेच्या माध्यमातून वृत्तपत्र विक्रेत्यांच्यासाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळासाठी संघटना प्रयत्न करत आहे. अनेक निवेदने, आंदोलने, बैठका झाल्या. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दोन वर्षापूर्वी स्वतंत्र कल्याणकारी मंडळाची घोषणा केली मात्र अद्याप अंमलबजावणी झालेली नाही. या कल्याणकारी मंडळाची अंमलबजावणी व्हावी यासाठी आता रस्त्यावरची लढाई करावी लागेल. उपस्थित सर्व पदाधिकारी व कार्यकारणी सदस्यांच्या चर्चेनंतर श्री पाटणकर यांनी आंदोलनाची घोषणा केली. कार्याध्यक्ष बालाजी पवार म्हणाले,अनेकवेळा मागणी करुनही कल्याणकारी मंडळाची अंमलबजावणी केली जात नाही. याबाबत सरकारला रस्त्यावर उतरुन जाब विचारावा लागेल. संघटना ज्या सुचना करेल, आंदोलन देईल त्याची अंमलबजावणी करावी. प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयावर, तहसीलदार कार्यालयासमोर आंदोलन करावे, सरचिटणीस विकास सूर्यवंशी यांनी सांगितले. राज्य संघटनेने घेतलेल्या ९ आक्टोंबरच्या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. प्रत्येक तालुका व जिल्हा पातळीवर हे आंदोलन करावे. संघटनेचे उपाध्यक्ष रघुनाथ कांबळे कोल्हापूर, गोरख भिलारे पंढरपूर, दिपक वाघमारे सांगली आदींनी या चर्चेत सहभाग घेतला.राज्य संघटनेच्या स्वावलंबी कल्याणकारी कोषबाबत या बैठकीत चर्चा करण्यात आली. श्री पाटणकर यांनी सविस्तर माहीती दिली. संघटनेचे सरचिटणीस विकास सूर्यवंशी यांनी राज्य संघटनेच्या माध्यमातून विविध मार्गाने या कल्याणकारी कोषमध्ये निधीची भर घालण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. विनोद पन्नासे, नरहरी लिंगायत, गोरख भिलारे, दिनेश उके आदींनी या विषयावरील चर्चेत भाग घेतला.

बैठकीस रविंद्र कुलकर्णी मालेगाव, विनोद पन्नासे चंद्रपूर, दिनेश उके, संजय बडोले गोंदिया, चंद्रकांत घाटोळ, बाबू जलदेवार, गणेश वडगावकर नांदेड, दत्तात्रय सरगर, विशाल रासनकर, दिपक वाघमारे सांगली, नरहरी लिंगायत, शिवाजी वाकोडे परभणी, मनिष वासनिक नागपूर, मल्लिकार्जुन वाले तडवळ,सचिन शेटे बार्शी, रघुनाथ कांबळे, आण्णा गुंडे, किरण व्हनगुत्ते, धनंजय शिराळकर,अंकुश परब, सुरेश चौगुले,परशराम सावंत, राजाराम पाटील कोल्हापूर, रविराज शेटे, उत्तम चौगुले सांगोला आदी प्रमुख पदाधिकाऱ्यांसह जिल्हाध्यक्ष, सचिव उपस्थित होते.बैठकीचे आयोजन सोलापूर जिल्हा वृत्तपत्र विक्रेता व एजंट संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवलिंग मेढेगार, सचिव सचिन बाबर, अंबादास शिंदे, अशोक खरात, भीमाशंकर ढमामे आणि नागेश कुंभार याच्यासह पदाधिकाऱ्यांनी केले.बैठकीतील ठराव पुढील प्रमाणे,कल्याणकारी मंडळासाठी ९ आक्टोंबरला राज्यभर परिवारासह मोर्चाचे आयोजन, स्वावलंबी कल्याणकारी कोषसाठी विविध माध्यमांतून निधीचे संकलन करणे, नोव्हेंबर ते डिसेंबर दरम्यान राज्य संघटनेचे नविन पदाधिकारी निवड सभा घेणे,१५ आक्टोंबर वृत्तपत्र विक्रेता दिनी राज्य संघटना सभासद नोंदणी अभियान राबवून मोठ्या प्रमाणात सभासद नोंदणी करणे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# स्वारातीम विद्यापीठात भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींचा अवतार दिन उत्साहात साजरा

नांदेड/प्रतिनिधी-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांच्या अवतार दिनानिमित्त विशेष प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यापीठाचे कार्यकारी अभियंता तथा व्याख्याते तानाजी हुस्सेकर यांनी भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांच्या मानवतावादी विचारांवर तसेच त्यांच्या सामाजिक समता, अहिंसा आणि मानवकल्याणाच्या कार्यावर उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाड, उपकुलसचिव रामदास पेद्देवाड, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम तसेच कार्यकारी अभियंता तानाजी हुस्सेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी मार्गदर्शन करताना तानाजी हुस्सेकर म्हणाले की, भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांनी समाजातील जातिभेद, अंधश्रद्धा, सामाजिक विषमता आदी अनिष्ट प्रथांना विरोध करून मानवतेवर आधारित विचारांचा प्रसार केला. महाराष्ट्राला आपली कर्मभूमी मानून त्यांनी धर्म, समाज आणि अध्यात्माच्या क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. स्त्री-पुरुष समानता, अहिंसा, दया, सदाचार, सत्य आणि सामाजिक समरसतेचा संदेश त्यांनी समाजाला दिला.भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांच्या शिकवणीतून माणसाने विवेक, सदाचार आणि मानवकल्याणाचा मार्ग स्वीकारावा, असा संदेश मिळतो. त्यांचे जीवनकार्य हे मानवता, समानता आणि ज्ञानाचा दीपस्तंभ असून, आजच्या काळातही त्यांचे विचार समाजासाठी दिशादर्शक आहेत, असे त्यांनी सांगितले. तसेच अवतार दिनानिमित्त उपस्थितांना शुभेच्छा दिल्या.

# भारतीय किसान सभेच्या वतीने पिंपळगाव फाटा येथे रास्ता रोको आंदोलन

मांडवी/प्रतिनिधी-किनवट तालुक्यात पावसाने दीर्घकाळ दडी मारल्याने खरीप हंगामातील पिके करपून गेली असून शेतकरी प्रचंड आर्थिक संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने किनवट तालुक्यासह संपूर्ण मराठवाड्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा, या प्रमुख मागणीसाठी पिंपळगाव फाटा येथे राष्ट्रीय महामार्गवर कॉ. अर्जुन आडे यांच्या नेतृत्वात जोरदार रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

किनवट व माहूर तालुक्यात पावसाअभावी खरीप पिके हाताची गेली असून शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. पिकांबरोबरच जनावरांच्या चाऱ्याचा आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही बिकट रूप धारण करू लागला आहे. या गंभीर परिस्थितीकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी किसान सभेच्या हाकेवर शेकडो शेतकरी रस्त्यावर उतरले. आंदोलकांनी पिंपळगाव फाटा येथे रस्त्यावर ठिय्या मांडून 'किनवट तालुक्यात तात्काळ कोरडा दुष्काळ जाहीर करा', 'बाधित शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये भरीव नुकसान भरपाई द्या' आणि 'खरीप पिकांचे सरसकट पंचनामे करून शंभर टक्के पीकविमा मंजूर करा' अशा मागण्या लावून धरल्या. या रास्ता रोको आंदोलनामुळे महामार्गाच्या दुतर्फा वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. आंदोलनाची तीव्रता पाहून पोलीस आणि महसूल प्रशासनाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. स.पो.नि. गगाधर गायकवाड व मंडळ अधिकारी सिगेवावर यांनी प्रत्यक्ष भेट देऊन शेतकऱ्यांच्या मागण्यांचे निवेदन स्वीकारले आणि आपल्या मागण्यांचे निवेदन शासनापर्यंत पोहोचवण्याचा आश्वासन दिले. या आंदोलनात अर्जुन आडे, जनार्दन काळे, मनोज सलवार, उल्हास महाराज, प्रताप पाटील, प्रकाश आडे, भाऊराव गुरनुले, शेख बाबा, माधव आदे, विलास बकेवार, कैलास चांदेकर, उमेश ठाकूर, मंगलाबाई कोतापैलीवार, रुखमाबाई कुडमते, मायाबाई हलवले, गणेश राठोड, रमेश इंगोले यांच्या सह अनेक शेतकरी उपस्थित होते.





(छाया : सारंग नेरलकर)

श्री गणपती बाप्पाच्या आगमनानिमित्त सिडको-हडको भागातील बाजारपेठेत नागरिकांनी गर्दी केली होती.

# नांदेड-भोकर मार्गावरील अपघात रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना करा!

## आ.श्रीजया चव्हाण यांची पोलीस अधीक्षकांकडे मागणी

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड ते भोकर या वर्दळीच्या मार्गावरील सिताखंडी घाटात सतत होणाऱ्या अपघातांची गंभीर दखल घेत, या ठिकाणी तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात याव्यात,अशी मागणी भोकर विधानसभा मतदारसंघाच्या आ.श्रीजया चव्हाण यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्याकडे एका पत्राद्वारे केली आहे.

आ. श्रीजया चव्हाण यांनी या पत्रात घाटातील तीव्र वळणे, ब्लाईंड स्पॉट्स आणि अतिवेगाने धावणारी वाहने यामुळे प्रवाशांच्या जिवाला सातत्याने मोठा धोका निर्माण होत असून, जीवितहानीच्या घटना रोखण्यासाठी प्रशासनाने तत्काळ पावले उचलण्याची गरज व्यक्त करुन काही मागण्या पोलीस प्रशासनासमोर मांडल्या आहेत. यामध्ये सर्व अपघातप्रवण क्षेत्रे आणि ब्लाईंड स्पॉट्सवर वाहनचालकांना स्पष्ट दिसतील असे धोक्याचा इशारा देणारे मोठे फलक लावणे, तसेच धोकादायक वळणांवर वाहनांचा वेग नियंत्रित करण्यासाठी रबर स्ट्रिप्स बसवण्याची मागणी करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त, अतिवेगाने जाणाऱ्या वाहनांना आळा घालण्यासाठी घाटात स्पिड गन सुविधा असलेले कॅमेरे बसवणे आणि वेग मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्यांवर तातडीने कठोर कारवाई करणे अपेक्षित असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. घाटातील वाहतुकीवर चोवीस तास लक्ष ठेवण्यासाठी कायमस्वरूपी पोलीस चौकी उभारण्यात यावी, या मागण्यांचा समावेश आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेचा हा अतिशय संवेदनशील आणि जिव्हाळ्याचा प्रश्न असल्याने, पोलीस प्रशासनाने याकडे अत्यंत गांभीर्याने लक्ष द्यावे. तसेच वरील सर्व मागण्यांवर पोलीस अधीक्षक स्तरावरून तातडीने व योग्य ती कार्यवाही करावी, असेही आ. श्रीजया चव्हाण यांनी या पत्रात नमूद केले आहे.

# व्हीपीके पतसंस्थेची रौप्य महोत्सवी सर्वसाधारण सभा संपन्न

उमरी/प्रतिनिधी-आणि गौरवशाली वाटचालीचा रौप्य महोत्सव सोहळा आज नांदेड शहरातील तरोडा येथील श्रीकृष्ण मंगल कार्यालयात मोठ्या उत्साहात पार पडला. संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेला नांदेड जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून तसेच संस्थेच्या २९ शाखांशी संबंधित सभासद, खातेदार, ठेवीदार, कर्मचारी व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी संस्थेच्या २५ वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेत भविष्यातील विकासाची दिशा निश्चित करण्यात आली. ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला आणि बचत गटांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी संस्थेच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना देण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना व्हीपीके पतसंस्थेचे चेअरमन मारोतराव कवळे गुरुजी म्हणाले की, सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण भागातील सर्वसामान्य माणसाला स्वतःच्या पायावर उभे करण्याचे काम व्हीपीके पतसंस्था गेल्या अनेक वर्षांपासून करत आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या धर्तीवर नांदेड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधायचा असेल, तर सहकारी संस्था अधिक सक्षम आणि मोठ्या प्रमाणात उभ्या राहणे आवश्यक आहे. शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी पतसंस्थेच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यावर आपला विशेष भर असल्याचे कवळे गुरुजी यांनी सांगितले. जिल्ह्यातील शेतकरी, सभासद आणि सर्वसामान्य नागरिकांनी व्हीपीके पतसंस्थेवर तसेच माझ्यावर मोठा विश्वास ठेवला आहे. या विश्वासाला कुठेही तडा जाऊ न देता अधिक पारदर्शक, विश्वासार्ह आणि लोकाभिमुख पद्धतीने संस्थेची वाटचाल सुरू ठेवण्याची ग्वाही देतो, असे त्यांनी नमूद केले. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महिला बचत गटांना आर्थिक सहाय्य, स्वयंरोजगाराच्या संधी आणि लघुउद्योगांना प्रोत्साहन देण्याची भूमिका संस्थेने घेतली आहे. ग्रामीण भागातील महिलांनी बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारावा, यासाठी व्हीपीके पतसंस्था सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचेही कवळे गुरुजी यांनी सांगितले. यासोबतच ग्रामीण भागातील युवक आणि महिलांना रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात, छोटे-मोठे लघुउद्योग उभे राहावेत आणि स्थानिक पातळीवर आर्थिक चक्र गतिमान व्हावे, यासाठी विविध योजनांचा अभ्यास सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या रौप्य महोत्सव सोहळ्यास पतसंस्थेचे संचालक मंडळ, संस्थेचे अधिकारी व कर्मचारी, २९ शाखांमधील सभासद, खातेदार, ठेवीदार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुखेड तालुक्यातील १२८ ग्रामसखींचे मानधन थकीत

मुखेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत उमेदच्या उपजीविका उपक्रमात कार्यरत असलेल्या मुखेड तालुक्यातील १२८ ग्रामसखींचे मागील तब्बल १८ महिन्यांपासून मानधन थकीत असल्याची बाब समोर आली आहे. थकीत मानधन तातडीने अदा करावे, या मागणीसाठी ग्रामसखींनी गटविकास अधिकारी शिवाजी ढवळे यांना निवेदन दिले.

तालुक्यातील १२८ गावांमध्ये ग्रामसखी कार्यरत असून, त्यांना दरमहा सहा हजार रुपये मानधन दिले जाते. मात्र, गेल्या दीड वर्षापासून मानधन न मिळाल्याने ग्रामसखींवर आर्थिक संकट ओढवले आहे. ग्रामीण भागातील महिला बचत गट, उपजीविका उपक्रम आणि अभियानाशी संबंधित विविध कामे नियमितपणे पार पाडूनही मानधन रखडल्याने ग्रामसखींमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. मानधन रखडण्यामागे उमेद विभागाकडून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न झाल्याचे सांगण्यात येत आहे. ग्रामसंघांना देण्यात आलेल्या अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र (यूसी) सादर न झाल्यामुळे मानधनाची प्रक्रिया रखडल्याची माहिती पुढे आली आहे. याबाबत उमेदचे जिल्हा समन्वयक द्वारकादास राठोड यांनी गटविकास अधिकारी शिवाजी ढवळे यांच्याशी भ्रमणध्वनीवरून चर्चा करताना तालुका समन्वयकांकडून आवश्यक प्रमाणपत्रे सादर न झाल्याची माहिती दिल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, उमेदचे तालुका समन्वयक भारत कंधारे यांनी थकीत मानधनाबाबत गटविकास अधिकाऱ्यांना आवश्यक माहिती अथवा कागदपत्रे सादर केली नसल्याचेही सांगण्यात येत आहे. त्यामुळे प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन कागदपत्रांची पूर्तता करून १८ महिन्यांचे थकीत मानधन तत्काळ अदा करावे, अशी मागणी ग्रामसखींनी केली आहे.

## रेती वाहतूक करणारे टिप्पर जप्त

नांदेड/प्रतिनिधी-अवैधरित्या रेती वाहतूक करणारे टिप्पर रविवारी दुपारी मल्हार चौक भागात पोलीसांनी पकडले आहे. टिप्पर क्र.एमएच २६ एडी-०१७६ यामध्ये रेती अवैधरित्या भरुन वाहतूक करीत असतांना मल्हार चौक भागात सदरील टिप्पर विमानतळ पोलीसांनी पकडले. या प्रकरणी आनंद बाबुराव मुसळे याच्या विरुध्द विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींनी विश्वकल्याणकारी मूल्ये समाजात रुजवली

## प.पू.प.म.श्री मधुकरबाबा शास्त्री कवीश्वर यांचे प्रतिपादन

माहूर/प्रतिनिधी-महानुभाव पंथाचे महास्थान असलेल्या श्रीदेवदेवेश्वर मंदिरात महानुभाव पंथाचे संस्थापक सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांची ८०६ वी जयंती भक्तीभावात व उल्हासात साजरी करण्यात आली. यावेळी आयोजित धर्मसभेत मार्गदर्शन करतांना माहूर पिठाधीश प.पू.प.म. श्री. मधुकरबाबा शास्त्री कवीश्वर यांनी सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींनी ८०० वर्षांपूर्वी विश्वकल्याणकारी मूल्ये समाजात रुजविली,असे प्रतिपादन केले.

यावेळी धर्मसभेच्या अध्यक्षस्थानी प.पू.प.म.श्री मुरारीमल्ल बाबा पाचराऊत हे होते, तर प.पू.प.म. श्री शहागडकर बाबा, प.पू.प.म. श्री संन्यासी बाबा, प.पू.श्री वी.भो.अमृते बाबा, प.पू.श्री कृष्णराज बाबा, प.पू. वैद्यराज बाबा, प.पू.श्री योगीराज बाबा व प.पू.श्री प्रदीपराजदादा पंजाबी यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. संस्थानचे वतीने सर्व विद्वत संत-महंतांचा शाल, श्रीफळ व पुष्पहाराने सन्मान करण्यात आला. पुढे बोलतांना पूजनीय महंत मधुकरबाबा शास्त्री म्हणाले की, वर्णव्यवस्थेच्या बंधनात समाज जखडलेला असतांना श्री चक्रधर स्वामी यांनी महाराष्ट्राला कर्मभूमी मानून समता, बंधुता, न्याय, अहिंसा आणि मानवतेवर आधारित नवमतांचा पुरस्कार केला. तसेच स्त्री-पुरुष समानता, सर्वांना शिक्षण, अस्पृश्यता निवारण, भूतदया, पर्यावरण संरक्षण, सामाजिक सौहार्द, बुद्धी प्रामाण्य, अंधश्रद्धा निर्मूलन असे महनीय कार्य करुन अवास्तव कर्मकांडाला विरोध केला. धर्मसभेत ई. श्री पार्थशास्त्री विद्वान्स, महंत वी. भो.अमृते, शाहीर दामोधर वजीरगावंकर, योगीराज बापू विद्वान्स व महंत मुरारीमल्ल बाबा यांनी अमोल असे मार्गदर्शन केले. यावेळी महानुभाव पंथीय संत, महंत, पुजारी व अनुयायी मोठ्या संख्येत उपस्थित होते. प्रास्ताविक ई. श्री छत्रपतीदादा कवीश्वर यांनी केले. सूत्रसंचलन प्रदीपदादा पंजाबी यांनी केले, तर आनंदराव गजभिये यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पंडित पाटील केशवे, उत्तमराव पाटील सुकळकर, राजु पाटील सुकळकर, प्रेम पाटील सुकळकर, परमेश्वर सुरोशे, सुरेश कोथळकर, बंडू ठाकरे व छगन भालेराव यांनी परिश्रम घेतले. महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# सासरच्या त्रासाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

नांदेड/प्रतिनिधी-सासरच्या मानसीक व शारिरीक त्रासाला कंटाळून एका विवाहित महिलेने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना शहरातील कैलाशनगर भागात घडली आहे.

सौ.मीरा सत्यम कल्याणे (वय २८) रा.कैलाशनगर,नांदेड या विवाहितेस पती सत्यम श्यामराव कल्याणे, श्यामराव कल्याणे, मीना श्यामराव कल्याणे, कुणाल श्यामराव कल्याणे यांनी दबाव आणुन नौकरी सोडायला भाग पाडले होते. त्यानंतर मीरा कल्याणे हीचा नेहमीच शारीरीक व मानसिक छळ पती सत्यम कल्याणे व सासरची मंडळी करीत असत. नेहमीच्या मानसीक त्रासाला कंटाळून व ताणतणावातून मीरा कल्याणे हिने शनिवारी गळफास घेवून आत्महत्या केली. याप्रकरणी गणेश सुरोसे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन भाग्यनगर पोलीस ठाण्यात पती सत्यम कल्याणेसह चार जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CHANGE IN NAME

My (old name) is **SAWANT PRIYANKA SURESH** which now I am, changing as (new name) **PRIYANKA RAHUL THORAT**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by

**PRIYANKA RAHUL THORAT**

R/o Apurwa plaza flat no.205, Bhavsar chowk Malegaon road Taroda bk Nanded-431605

Mob. No.8668519074

CHANGE IN NAME

My (old name) is **SUCHITA NANDKUMAR BHASKARAO MAHAJAN** which now I am, changing as (new name) **SUCHITA NANDKUMAR MAHAJAN**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by

**SUCHITA NANDKUMAR MAHAJAN**

R/o 1-17-1150, Hari om Visawa nagar near Rest house Nanded-431602

Mob. No.9764311000

CHANGE IN NAME

My (old name) is **SUBHASH MAOHANRAO CHADAWAR** which now I am, changing as (new name) **SUBHASH MADHAVRAO CHADAWAR**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by

**SUBHASH MADHAVRAO CHADAWAR**

R/o Rajendra nagar, At Post Kinwat Dist Nanded

Mob. No.9764311000

CHANGE IN NAME

My (old name) is **PATHAN JAVEED KHAN** which now I am, changing as (new name) **PATHAN JAVID KHAN IBRAHIM KHAN**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by

**PATHAN JAVID KHAN IBRAHIM KHAN**

R/o H.no.B 98, Police colony Shobha nagar, Nanded-431605

Mob. No.9657074761

CHANGE IN NAME

My old name is **BAUMER IRFAN** which now I changing as new name **IRFAN ABDUL REHMAN BAUMER** my all correspondance will be done As my new name please consider the same.

Address

Near ameer hamza masjid Barkat pura waghi Road Nanded.

Mob. No.9561230523

# मुखेड तालुका खरेदी विक्री संघाच्या निवडणूकीत ८ संचालकांची बिनविरोध निवड

मुखेड/प्रतिनिधी-येथील तालुका खरेदी विक्री संघाच्या १५ संचालक पदासाठी निवडणूक प्रक्रिया सुरू असून अनेक उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने सेवा सहकारी संस्था गटातील ८ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.

आता उर्वरित ७ संचालक पदांसाठी निवडणूक होणार असून, १५ सप्टेंबर रोजी निवडणूक रिंगणात असलेल्या उमेदवारांना चिन्ह वाटप करण्यात येणार आहे, तर २३ सप्टेंबर रोजी मतदान होणार आहे. निवडणूक होत असलेल्या मतदारसंघाची माहिती पुढीलप्रमाणे आहे वैयक्तिक मतदारसंघातून २ उमेदवार, ओबीसी मतदारसंघातून १, व्हीजेएनटी मतदारसंघातून १, अनुसूचित जाती-जमाती मतदारसंघातून १, तर महिला प्रवर्गातून २ उमेदवार निवडून द्यायचे आहेत. सेवा सहकारी संस्था गटातून डी. एस. गोपनर (मुखेड), विजय मस्कले (सावरगाव), दत्तात्रय रामचंद्र पाटील (बेटमोगरा), आनंद शिंदे (पाळा), अनुराधा कदम (राजुरा), व्यंकटराव वाडीकर (मुक्रमाबाद), व्यंकटराव उमाटे (बा-हाळी), माधवराव पाटील(वडजे-एकलारा) हे संचालक म्हणून बिनविरोध निवडून आले आहेत. वैयक्तिक मतदारसंघ-बळवंत पाटील बेटमोगरेकर, भानुदास पाटील भोसले, बालाजी बंडे धोंडीराम अस्वले, ओबीसी मतदारसंघ जगन्नाथ तरगुडे, व्हीजेएनटी मतदारसंघ नागोराव पाटील, श्रीराम खांडेकर, बालाजी विठ्ठल, एससी-एसटी मतदारसंघ-रमेश धर्माजी पडलवार, महिला राखीव मतदारसंघ-गवते चिमाबाई नागोराव, उज्वला अरुण बंडे, अनुसया बालाजी पाटील, सुमनबाई गंगाधर रिंगणात असलेल्या उमेदवारांना १५ सप्टेंबर रोजी चिन्ह वाटप केले जाणार असून २३ सप्टेंबर रोजी मतदान होणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी चव्हाण यांनी दिली आहे.

# सर्वसामान्यांच्या घरकुलासाठी वाळू उपलब्ध करुन द्या-खा.रवींद्र चव्हाण

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यातील गौण खनिज उत्खनन, अवैध उत्खनन तसेच शासनाच्या महसुलाशी संबंधित बाबींचा आढावा घेण्यासाठी जिल्हा गौण खनिज विभागाची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत सामान्य नागरिकांना घरकुल बांधकामासाठी आवश्यक असलेली वाळू वेळेवर व परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून द्यावी, अशी आग्रही मागणी खा. रवींद्र चव्हाण यांनी केली.

घरकुल हे प्रत्येक सामान्य माणसाचे स्वतःच्या हक्काचे घर असावे, हे त्याचे आयुष्यभराचे स्वप्न असते. शासनाच्या विविध घरकुल योजनांमधून जिल्ह्यात मोठ्या संख्येने लाभार्थ्यांना घरकुल मंजूर झाले आहेत. मात्र, घरकुल बांधकामासाठी आवश्यक असलेली वाळू वेळेवर उपलब्ध होत नसल्यामुळे अनेक लाभार्थ्यांचे बांधकाम रखडले आहे. त्यामुळे केवळ वाळूअभावी सामान्य नागरिकांचे घराचे स्वप्न अपूर्ण राहू नये, यासाठी प्रशासनाने ठोस उपाययोजना करावी, असे खासदार चव्हाण यांनी स्पष्ट केले. बैठकीत खा.चव्हाण यांनी प्रशासनाकडून घरकुल योजनेअंतर्गत आतापर्यंत किती लाभार्थ्यांची नोंदणी व मंजुरी झाली आहे, त्यापैकी किती लाभार्थ्यांनी वाळूसाठी मागणी अथवा नोंदणी केली आहे आणि प्रत्यक्षात किती लाभार्थ्यांना प्रशासनामार्फत



वाळू उपलब्ध करून देण्यात आली आहे, याची तालुकानिहाय माहिती मागितली. ज्या लाभार्थ्यांना अद्याप वाळू मिळालेली नाही, त्यांना वाळू उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने कोणती व्यवस्था केली आहे, याबाबतही त्यांनी स्पष्ट माहिती मागितली. घरकुलासाठी स्वतंत्र कोटा ठेवण्याची मागणीघरकुल लाभार्थ्यांना प्राधान्याने आणि पारदर्शक पद्धतीने वाळू उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा किंवा निश्चित कोटा ठेवण्यात आला आहे का, याची माहिती घेऊन आवश्यक असल्यास त्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करावी, अशी मागणी खासदारांनी केली. घरकुल मंजूर झालेले असताना वाळू मिळत नसल्याने लाभार्थ्यांना बांधकाम सुरू करता येत नाही. त्यामुळे प्रलंबित घरकुल लाभार्थ्यांना ठराविक कालमर्यादेत वाळू उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करावी, असे निर्देशवजा आवाहन खासदार चव्हाण यांनी प्रशासनाला केले.

**उत्खननावर कठोर कारवाई करा**

दरम्यान, जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध गौण खनिज उत्खनन, वाहतूक व साठवणुकीवरही बैठकीत चर्चा झाली. अवैध उत्खननामुळे शासनाचा महसूल बुडण्याबरोबरच पर्यावरण, रस्ते, शेती आणि सार्वजनिक निसर्गसंपत्तीचे नुकसान होत असल्याने अशा प्रकारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी खासदारांनी केली.केवळ कागदोपत्री कारवाई न करता संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करणे, वाहन तपासणी करणे, उत्खननाचे प्रमाण आणि शासनाला मिळणारा महसूल याची नियमित तपासणी करावी, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

# हदगांव शहरात केवळ कंत्राटदाराचे हित जोपासण्यासाठी सिमेंट नाली,रस्त्याचे काम

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव शहरातील जिल्हा परिषद शाळेसमोरील आलेल्या सिमेंट नालीच्या कामाबाबत अनेक तक्रारी असताना केवळ कंत्राटदराचे हित जपण्यासाठी नालीचे कोणतेही आऊटलेट न काढता या व्यतिरिक्त सिमेंट रोडचे थातूरमातूर काम करण्यात येत असून सदर काम कंत्राटदराच्या नावावर जिल्ह्यातील एका बड्या राजकीय नेत्याचे काम असल्याची चर्चा असून या कामा बाबतीत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

या कामाची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून तांत्रिक तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे, पण या निवेदनाकडे कमालीचे दुर्लक्ष करण्यात आले. यासंदर्भात नगराध्यक्षांकडे लेखी निवेदन देण्यात आले होते पण त्यावर कोणतीच कारवाई झालेली नाही आहे. निवेदनानुसार, शाळेसमोरील नालीचे काम सुरू असले तरी सदर नालीला योग्य आउटलेट नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. नालीतील पाणी नेमके कुठे सोडण्यात येणार, याबाबत स्पष्टता नसल्याने पावसाळ्यात नालीमध्ये पाणी साचण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे शाळेत ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांसह पालक व नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी चिंता व्यक्त करण्यात आली आहे. विशेष म्हणजे जिल्हा परिषद शाळेच्या परिसरात विद्यमान खा.नागेश पाटील आष्टीकर यांची पण शैक्षणिक संस्थाही असल्याने ते पण या कामाबाबतीत 'मौन'धारण केल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झालेल असतांना यासंबंधी आ.बाबूराव कदम कोळीकर यांनी पण लक्ष घातले होते. नंतर काय झाले याची माहिती भेटू शकली नाही. शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा विचार न करता कोणत्या प्रकारे नियोजन न करता काम करण्यात आल्यास भविष्यात गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे. तांत्रिक मंजुरी कोणत्या निकषावर सदर नालीच्या कामाला तांत्रिक मंजुरी कोणत्या आधारावर देण्यात आली, नालीचे सांडपाणी कुठे सोडण्यात येणार आहे आणि त्यासाठी योग्य नियोजन करण्यात आले आहे का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. संबंधित विभागाकडून समाधानकारक खुलासा होईपर्यंत नालीच्या कामाला स्थगिती देण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली होती परंतु नागरिकांनी केलेल्या सूचनाचा कोणताही विचार करण्यात आलेला नाही. सदर हे बहुचर्चित सिमेंट नालीचे काम नेमके कोणता कंत्राटदार करत आहे? किती रुपायांची शासकीय मान्यता आहे की नाही? याबाबत काहीच माहीती मिळत नाही. सार्वजनिक बांधकाम उपविभागीय अभियंता हनमंते यांच्याशी भेट घेतली असता त्यांनी सांगितले की, मी नुकताच पदभार स्वीकारलेला आहे याबाबतीत मला फारशी माहिती नाही.

# मुंबईच्या आंदोलनात हजारोंच्या संख्येने सहभागी व्हा-मराठा आंदोलकांचे आवाहन

उमरखेड/प्रतिनिधी-मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे गेल्या १५ दिवसांपासून सुरू केलेल्या उपोषणानंतरही शासनाने ठोस निर्णय न घेतल्याने मराठा समाज आक्रमक झाला आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईच्या आझाद मैदानात होणाऱ्या आंदोलनात उमरखेड तालुक्यातून हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन तालुक्यातील मराठा आंदोलकांनी केले आहे.

स्थानिक शासकीय विश्रामगृहावर आयोजित पत्रकार परिषदेत आंदोलकांनी शासनाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. यावेळी सरोज देशमुख, प्रमोद देशमुख, गणराज कदम, दिनेश रावते, शुभम माने, चांदराव सुरोशे, गजानन कोल्हे, सचिन घाडगे, आनंद शिंदे, अभय पवार, अरुण ठाकरे, गजानन जाधव, अंकुश मिराशे, अमोल मिराशे, श्रीकांत धाबे, गजानन वटाणे यांच्यासह तालुक्यातील मराठा बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.पत्रकार परिषदेत आंदोलकांनी काही प्रमुख मागण्या केल्या आहेत.मागील वेळी समाजाच्या लेकरांचे भवितव्य लक्षात घेऊन मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आंदोलन मागे घेतले होते. मात्र यावेळी १५ दिवस उलटूनही मागण्या मान्य न झाल्याने जरांगे पाटील यांनी पुन्हा मुंबईतील आझाद मैदानात आंदोलनाची भूमिका घेतली आहे. त्याला पाठिंबा देण्यासाठी कालपासूनच अंतरवालीकडून हजारो मराठा बांधव मुंबईकडे रवाना होत असून, उमरखेड तालुक्यातूनही मोठ्या संख्येने बांधव जाणार आहेत. सरकारने तातडीने हैदराबाद गॅझेटनुसार अंमलबजावणी करावी व शिंदे समितीचे काम पूर्ण करून आंदोलकांना न्याय द्यावा, अशी मागणी पत्रकार परिषदेतून करण्यात आली.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कुंडलवाडीत पोलिसांचे पथसंचलन

कुंडलवाडी/प्रतिनिधी-गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी आणि गणेशोत्सव शांततेत पार पडावा, या उद्देशाने कुंडलवाडी शहरात रविवारी पोलीस प्रशासनाच्यावतीने पथसंचलन करण्यात आले.

सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांच्या नेतृत्वाखाली हे पथसंचलन पार पडले. शहरातील प्रमुख मार्गांवरून पोलिसांनी शिस्तबद्ध पद्धतीने संचलन करीत नागरिकांना सुरक्षिततेचा संदेश दिला.



गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज असल्याचे या पथसंचलनातून स्पष्ट करण्यात आले.यावेळी पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र माजरमकर, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय गिरी यांच्यासह १० पोलीस कर्मचारी आणि २३ गृहरक्षक दलाचे जवान सहभागी झाले होते. गणेशोत्सव काळात नागरिकांनी शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले.




आ.प्रताप पाटील चिखलीकर यांच्या निवासस्थानी आज भक्तीमय वातावरणात श्री गणेश मूर्तीची स्थापना विधीवत पूजा करुन करण्यात आली. यावेळी पोलीस उपमहानिरिक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन, माजी आ.मोहनअण्णा हंबर्डे, प्रविण पाटील चिखलीकर, प्रणिता देवरे व चिखलीकर कुटुंबिय उपस्थित होते.

# कंधार डॉक्टर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी डॉ.गजानन अंबेकर

कंधार/प्रतिनिधी-कंधार डॉक्टर्स असोसिएशनची निवडणूक दि.१२ सप्टेंबर रोजी संपन्न झाली त्या मध्ये सर्वानुमते डॉ.गजानन अंबेकर यांची अध्यक्ष पदी निवड करण्यात आली तर डॉ.प्रदीप राजपूत यांची तिसऱ्यांदा सचिव पदी फेरनिवड करण्यात आली.

उपाध्यक्ष पदी डॉ.भगवान वाघमारे व डॉ.स्वेता दासरे यांची निवड करण्यात येवून उर्वरित कार्यकारिणी मध्ये कोषाध्यक्ष म्हणून डॉ. विवेक कल्याणकस्तुरे तर प्रसिद्धी प्रमुख म्हणून डॉ. माधव कुद्रे यांची तसेच सल्लागार पदी डॉ. राजेश गुट्टे, डॉ. दिनकर जायभाये आणि कार्यकारिणी महिला सदस्य म्हणून डॉ. अर्चना जाधव व डॉ. धनश्री पेठकर अशी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. या महत्वपूर्ण बैठकीमध्ये डॉ. रामभाऊ तायडे, डॉ.भगवानराव जाधव,डॉ. संतोष पदमवार डॉ.संजय मारोतराव केंद्रे, डॉ. ज्ञानेश्वर केंद्रे, डॉ. बालाजी मद्रेवार, डॉ. बालाजी कागणे, डॉ. प्रकाश सादलापुरे, डॉ. रहीम पठाण, डॉ. बाळासाहेब पवार, डॉ. गजानन ढगे, डॉ. लक्ष्मीकांत पेठकर, डॉ. अमोल केंद्रे, डॉ. बेद्रे, डॉ. दीपाली तायडे, डॉ. सुचिता फाजगे, डॉ. मिनाक्षी सादलापुरे, डॉ. उषा जाधव, डॉ. सौ. कल्याणकस्तुरे आदिंची उपस्थिती होती.

# जमादार परशुराम इंगोले यांची पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती

देगलूर/प्रतिनिधी-मरखेल पोलीस ठाण्यात कार्यरत जमादार परशुराम पांडुरंग इंगोले यांची नुकतीच पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती झाली आहे.

अगदी सामान्य कुटुंबातून आलेले इंगोले यांनी कठोर मेहनत, चिकाटी आणि शांत स्वभावाच्या जोरावर पोलीस दलात आपली वेगळी ओळख निर्माण केली. सन २०१३ मध्ये विभागीय परीक्षा उत्तीर्ण



होऊन जमादार पदावर पदोन्नती मिळविल्यानंतर त्यांनी सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्यास नेहमीच प्राधान्य दिले. सेवाकाळात प्रामाणिकपणे कर्तव्य बजावल्याबद्दल त्यांचे विशेष कौतुक केले जाते. पदोन्नती बद्दल मरखेल ठाणेप्रमुख रवि हुंडेकर, सहायक पोलीस उपनिरीक्षक विलास पवार, पोलीस कर्मचारी,पत्रकार बांधव, मित्रमंडळी व नातेवाईकांनी इंगोले यांचे अभिनंदन करून पुढील सेवेसाठी शुभेच्छा दिल्या.

# माजी महसूल राज्यमंत्री ॲड.मदन बाफना यांचे निधन

वडगाव मावळ:महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते, मावळ तालुक्याचे सुपुत्र तथा माजी महसूल व परिवहन राज्यमंत्री ॲड. मदन बाफना यांचे सोमवारी (दि.१४) वयाच्या ८५ व्या वर्षी आजारपणामुळे निधन झाले आहे. त्यांच्या निधनाने मावळ तालुक्यासह पुणे जिल्ह्याच्या राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. ॲड. मदन बाफना यांची राजकीय कारकीर्द अत्यंत प्रदीर्घ आणि प्रभावी राहिली.१९६७ मध्ये एलएल.बी.चे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी वकिलीबरोबरच सार्वजनिक जीवनात प्रवेश केला होता.

पान १ वरुन

## लहरी पावसाने चिंता वाढवली;...

आगमनामुळे सर्वत्र भक्तीमय व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून यंदा गणपती बाप्पांचा मुक्काम बारा दिवस राहणार आहे. गणेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर नांदेड शहर व जिल्ह्यात कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. अतिसंवेदनशील भागातही पोलीसांचे विशेष लक्ष असून त्या ठिकाणी नियमित पोलीसांची गस्त राहणार आहे.

## मनोज जरांगे यांना पुन्हा धक्का;...

आणि आर्थिक केंद्रांच्या कामकाजावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. दरम्यान, मुंबई पोलिसांनी दुसऱ्यांदा परवानगी नाकारल्यानंतर मनोज जरांगे नेमके काय करणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. मुंबई पोलिसांनी आझाद मैदानावर उपोषणाला परवानगी नाकारली असली तरी आपण एकट्याने उपोषणाला जाणार असल्याचं मनोज जरांगे यांनी जाहीर केलं आहे.

# धुरपतबाई सोनकांबळे यांचे निधन

उमरी/प्रतिनिधी-उमरी शहरातील व्यंकटेशनगर येथील ज्येष्ठ महिला सौ.धुरपतबाई खंडोजी सोनकांबळे गोरठेकर (वय ७४)



यांचे दिर्घ अजाराने दुःखद निधन झाले आहे. सौ.धुरपतबाई सोनकांबळे ह्या खंडु तुळसीराम सोनकांबळे यांच्या पत्नी तर पत्रकार पांडुरंग सोनकांबळे, साहेबराव सोनकांबळे, राजेश सोनकांबळे यांच्या आई आणि दिपक वारघडे यांच्या आजी होत.त्यांच्या पार्थिवावर सोमवारी दुपारी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# देगलूर शिवसेना (शिंदे गट) तालुक्याची नवीन कार्यकारिणी जाहीर

देगलूर/प्रतिनिधी-शिवसेना (शिंदे गट) देगलूर तालुक्याची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून, तालुकाप्रमुखपदी डॉ. व्यंकट धुमाळे यांची तर महिला तालुकाप्रमुखपदी ज्योतीताई वरखींडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

नवीन कार्यकारिणीनुसार विवेक सावरकार परकंटवार यांची तालुका संघटक, बाळू अण्णा काब्दे यांची देगलूर शहरप्रमुख, तर संगीता कदम यांची महिला शहरप्रमुख म्हणून निवड करण्यात आली आहे. नियुक्त झालेल्या पदाधिकाऱ्यांना शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख व्यंकटराव पाटील खतगावकर आणि शिवसेना नेते अशोकराव पाटील राजुरकर यांच्या हस्ते अधिकृत नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी नव्या पदाधिकाऱ्यांनी पक्ष संघटना अधिक सक्षम करण्यासाठी तसेच जनतेच्या प्रश्नांसाठी प्रभावीपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक बालाजी पाटील खतगावकर यांनी नव्याने नियुक्त झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास युवासेना जिल्हाप्रमुख नामदेव पाटील थडके, गंगाधर तमलुरकर, व्यंकट पुरमवार, ॲड. अंकुशराजे पाटील जाधव, ॲड. अशोक कापसे, अनुजा पाटील यांच्यासह शिवसेनेचे अनेक स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४